विज्ञानाच्या दृष्टिकोनातून

# चार्वाकवाद आणि अध्यात्म

प्रा. अद्वयानंद गळतगे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**विज्ञानाच्या दृष्टिकोनातून : चार्वाकवाद आणि अध्यात्म**
प्रा. अद्वयानंद गळतगे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रा. अद्वयानंद गळतगे
पो. भोज, ५९१२६३
जि. बेळगावी
मो. नं. : ०९९०२००२५८५

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# *अनुक्रमणिका*


१. पुरस्कार........................................ ५

२. भूमिका........................................ ८

३. विज्ञानाच्या दृष्टिकोनातून चार्वाक-दर्शन............. ११

४. वैज्ञानिक ज्ञानाचे प्रामाण्य........................... २२

५. जीवोत्पत्ती : रूढ जीवशास्त्राला न सुटलेले कोडे...... ३८

६. प्लँचेटचे वैज्ञानिक संशोधन.......................... ५३

७. मानवावर ग्रहांचा प्रभाव पडतो काय? ............... ७६

८. संत साहित्यातील वैज्ञानिक अंधश्रद्धा निर्मूलन ........ ९३

९. ज्ञानेश्वरीतील विश्वोत्पत्ति-विज्ञान.................... १२८

१०. तरी न करितां पांडवा भजन जहालें.................. १३७

११. भगवद्गीतेत ''निष्काम कर्मयोग'' नाही?.............. १४५

१२. भगवद्गीतेचा अधिकारी कोण? ..................... १६६

१३. अष्टवक्रगीता अर्थात केवल अद्वैत वेदांत ........... १७६


✦✦✦

# पुरस्कार

कोणत्याही विषयावरील लेख अनेक वेळा, वेगळ्या काळी व वेगळ्या माध्यमातून प्रसिद्ध होतात. लेख लिहिण्याचा हेतूही त्या त्या वेळी वेगळा असतो. असे लेख सहसा कोणी एकत्र करून ठेवीत नाहीत. त्यामुळे ते विस्मृतीत जाण्याचा मोठाच संभव असतो. यासाठी त्यांचा एकत्रित ग्रंथ तयार करणे हे महत्त्वाच्या विषयांचे बाबतीत तरी आवश्यक आहे. 'विज्ञानाच्या दृष्टिकोनातून चार्वाकवाद व अध्यात्म' हा मा. प्राचार्य गळतगे यांचा लेखसंग्रहात्मक ग्रंथ विचक्षण वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. लेखसंग्रह असूनही प्रथमपासून शेवटपर्यंत त्यात काही संगतवार मांडणी करून ग्रंथाच्या शीर्षकाला न्याय देण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला असल्याचे लक्षात येते.

या सुसंगत संकलनात प्रथम लक्षात येतो तो लेखकाचा अप्रतिहत सर्वांगीण व्यासंग व भाषेवरील प्रभुत्व. अत्याधुनिक विज्ञानातील अमूर्तता (Abstraction), प्लँचेटसारखे गूढ, ग्रहांचा मानवावरील परिणाम, बुद्धिवाद, अंधश्रद्धावाद्यांचे पोकळ तर्क, गीता, उपनिषदे, संतवाङ्मय, अष्टावक्र गीतेसारखा अद्वैताचा परमोत्कर्ष सांगणारा ग्रंथ इत्यादींचे सूक्ष्म व विषयसंगत चिंतन थक्क करणारे आहे. विशिष्ट हेतू मनात ठेवून (committed) लेखन करणारे पुरोगामी विचारवंत व त्या लेखनाचा उपयोग करून काहीतरी (काहीतरीच) वेगळे लिहिण्याचा छंद सांभाळणारे लेखक यांचा यथास्थित परामर्ष घेऊन लेखकाने मोठेच कार्य केले आहे. गीतेसारख्या भारतीय मानसात दृढमूल असलेल्या ग्रंथाचे विकृतीकरण केल्याशिवाय ज्यांचे तत्त्वज्ञान मूळ धरू शकत नाही त्यांना हा खटाटोप करावा लागतो. त्याचा प्रा. दीक्षितांसारखे 'स्ववैशिष्ट्यवादी' लेखक स्वैरपणे उपयोग करून घेतात.

नव्या विज्ञानात 'गॉड पार्टिकल'ची कल्पना पुढे आली असून तो पकडणारास पुढील नोबेल पारितोषिक मिळणार असे म्हटले जाते. या शब्दरचनेतच 'Ghost in the atom' ची फेररचना केलेली दिसते. तरीही येथे पार्टिकल व ॲटमची कल्पना सुटलेली नाही. दृश्यविश्वाच्या रचनेच्या वैज्ञानिक संकल्पनेमध्ये (Model) 'शेवटचा सूक्ष्म घटक' ही कल्पना स्वीकारल्याशिवाय बऱ्याच वैज्ञानिकांचे

समाधान होत नाही; परंतु नवे विज्ञान व अध्यात्मशास्त्र यांचे विचार सकारण त्यांच्या विरोधात जातात. विज्ञान प्रयोगाने व अध्यात्म सूक्ष्मातिसूक्ष्म चिंतनाने त्याचे त्याचे निष्कर्ष काढते. विज्ञानालाही सूक्ष्म चिंतनाची व अध्यात्माला अत्यंत साध्या प्रयोगाची जरूर आहे. उदा : $E = mc^2$ हे समीकरण सूक्ष्म चिंतनाने जाग्या झालेल्या प्रतिभेतून उतरले आहे. त्याला प्रयोगाचा साज नंतर देण्यात आला. 'तत्त्वमसि' महावाक्यात उंबराच्या बी चा प्रयोग श्वेतकेतूला करण्यास सांगितले गेले. विज्ञानाच्या विचारांची व प्रयोगाची परिसीमा गाठल्यानंतरही (ती जेव्हा गाठली जाईल तेव्हा जावो!) जे केवळ अस्तित्व (सत्) व केवळ ज्ञान उरते (चित्) त्याचा स्वीकार करावाच लागेल. विज्ञानाने अध्यात्म सिद्ध होते ते असे! जॉन डॉबसनची **Theory of appearance** ही विश्वोत्पत्तीच्या संदर्भात मांडली गेली आहे. 'Sudden Startling appearance' असा त्याचा अर्थ शब्दकोशात दिला आहे. अचानक व आश्चर्यकारक असे शब्द वापरले असले तरी त्यांना सत्यतेचा वास येतोच. वेदांतशास्त्र दृश्य जग अनिर्वचनीय असल्याचे सांगते. त्यात त्याचे सत्यत्व स्वीकारलेले नाही. श्री ज्ञानदेवांच्या अमृतानुभवात दृश्य जगताविषयी मिथ्यत्वाची कल्पना स्वीकारली नसून ब्रह्म (शिव) व दृश्य जगत् दाखविणारी शिवा यांचे ऐक्य सांगितले आहे. नव्या विज्ञानाशी या विचारांची अत्यंत जवळीक आहे. 'दोघा दोपण नाही पुरे, नेदेतीच कवतुकी एकपण फुटो,' 'वियाली परी न मोडे दोघुलेपण', 'परी ने दितीच तिसरा झोक लागो' इत्यादी वाक्ये (अमृ. १-४, ५, ६, ७) मायावाद झटकून टाकतात; परंतु दृश्य जगाला स्वतंत्र सत्ता नाही अशा अर्थाने त्याचे सत्यत्व नाकारतात.

शुद्ध ज्ञान (Pure consciousness) ही आध्यात्मिक संकल्पना नव्या विज्ञानाला मोठेच आव्हान आणि आवाहनही ठरत आहे. वृत्तिज्ञान (Qualified Consciousness) हे सर्वांच्या चिरपरिचयाचे असून विज्ञानाचा अपरंपार पसारा या ज्ञानाशीच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे निगडित आहे. 'शून्य' ही कल्पना वृत्ती व ज्ञान यांत मध्यम मार्ग शोधण्याचा प्रयत्न करते; पण तिला जराही यश आलेले नाही. 'हे शून्य' असे ज्ञान ज्याच्या सत्तेवर होते तो ज्ञानरूप आत्मा स्वीकारावाच लागतो. 'नवा जीव' प्रयोगशाळेत तयार करावयाचा असेल तर हे शुद्ध ज्ञान त्यांत घालावे लागेल किंवा निर्माण करावे लागेल. शुद्ध ज्ञानरूप आत्मा 'अज' असल्याने तो असा निर्माण करता येणार नाही, असे वेदांतशास्त्र सांगते. शुद्ध ज्ञान अनादि, आद्य व नित्यप्राप्त आहे. यामुळे शुद्ध जाणीव किंवा

ज्ञान हा वैज्ञानिकांचा आज निकराचा संशोधनाचा विषय झाला आहे. (Hot pursuit)

दूरस्थ ग्रहांचा व उपग्रहांचा मानवी जीवनावरील परिणाम हा असाच वादग्रस्त विषय आहे. पीएच्. डी.साठी लिहिलेल्या शोधनिबंधात अमावास्या व पौर्णिमेला गर्भवती स्त्रियांच्या पिच्युएट्री ग्रंथीत तिच्या स्रावाला समुद्राप्रमाणेच 'भरती' येत असल्याने त्या सुमारास अधिक प्रसूती होतात असा निष्कर्ष काढला आहे. हा स्राव प्रसूतीची प्रक्रिया सुरू करतो. हा निबंध मुंबई विश्वविद्यालयाने मान्य केला आहे. फेपरे (Epilepsy) हा आजारही पौर्णिमा व अमावास्येला वाढतो हा केवळ समज नसून ते एक वास्तव आहे. याच ग्रंथात पं. नेहरूंविषयी सांगितलेल्या भविष्याविषयी उल्लेख आहेच.

अंधश्रद्धा या शब्दाऐवजी विकृत श्रद्धा असा शब्द वापरणे अधिक सयुक्तिक होईल. नरबळी देण्यासारख्या श्रद्धेला गीतेने तामस श्रद्धा असे म्हटले आहे. हीच विकृती होय. श्रद्धेचे महत्त्व सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे. त्यांना ज्या साधनांनी मोक्ष मिळाला ती साधने त्यांनी अभंग / ओवीद्वारे नोंदवून ठेविली. त्यावर मोक्षार्थी साधकाने पूर्ण श्रद्धा ठेवून मोक्ष प्राप्त करून घ्यावा. श्री ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, गोरोबाकाका, गाडगे महाराज यांसारख्यांच्या शिकवणीवर कोणीही संपूर्ण विश्वास ठेवावा. त्यातच शाश्वत सुखाची व्यवस्था आहे.

या बहुआयामी ग्रंथाला पुरस्काराच्या माध्यमातून न्याय देणे शक्य होणार नाही. त्याला पुरस्कार देणे हा मी माझा सन्मान समजतो. या प्रकारचे ग्रंथ वाचनाची आवड, निकड, सवड व समज सुशिक्षितांमध्येही मिळणे हल्ली कठीण झाले आहे. माहितीच्या स्फोटात ज्ञानाचा आवाज क्षीण होत आहे. केवळ विज्ञानाच्या कोण्या शाखेची पदवी मिळून वैज्ञानिक दृष्टिकोन मिळतोच असे नाही. या ग्रंथाचा सर्वदूर प्रसार होणे अत्यंत आवश्यक असून त्यावरही विचारमंथन अवश्य व्हावे. 'तुटे वाद संवाद तो हितकारी' हे समर्थवचन सार्वकालिक आहे. या ग्रंथातील सर्व विधाने सप्रमाण केली असल्याने त्यात दडपून सांगितलेले विचार नाहीत. प्रमाणे वादास्पद असू शकली तरी ती विचाराला चालना देतील यात शंका नाही. असा हा सर्वांगसुंदर संकलनात्मक ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल प्राचार्य श्री. गळतगे यांचे अभिनंदन!

श्रीकृष्ण द. देशमुख, मुरगूड.

✦✦✦

# भूमिका

हे पुस्तक पूर्वी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह आहे. लेखांचे विषय वेगवेगळे असले तरी त्या सर्वांचे सूत्र विज्ञान हेच आहे. काही जणांना असा प्रश्न पडेल की, या पुस्तकातील भगवद्गीता, अष्टावक्रगीता यासारख्या विषयात विज्ञान कोठे आहे? म्हणून विज्ञानाचा अर्थ प्रथम स्पष्ट करणे आवश्यक आहे.

विज्ञान म्हणजे पाश्चात्त्यांचे आधुनिक भौतिक विज्ञान अशी अनेकांची समजूत आहे; वस्तुतः सत्यशोधनाच्या पद्धतीला विज्ञान म्हणतात. या अर्थाने विज्ञान हा शब्द आपल्या ऋषिमुनींनी उपनिषदातून फार पूर्वीच वापरला आहे; कारण उपनिषत्कार ऋषिमुनींचे सत्य शोधणे हेच मुख्य उद्दिष्ट होते. उदा. छांदोग्य उपनिषदात विज्ञानाच्या अभ्यासानेच सत्य कळते म्हणून सत्य जाणण्यासाठी विज्ञानाचाच अभ्यास करावा, असे सनत्कुमारांनी नारदाला स्पष्ट सांगितले आहे. (छां. उप. ७.१६.१७) भगवद्गीतेत कृष्णाने 'जे जाणल्यामुळे जाणण्यासाठी काही उरत नाही' अशा ज्ञानात विज्ञानाचा समावेश केला आहे. (भ. गी. ७.२) जे जाणल्यामुळे जाणावयास काही उरत नाही त्याला 'अंतिम सत्य' म्हणतात. याचा अर्थ असा की, विज्ञानाने अंतिम सत्याचे (म्हणजे ईश्वराचे) ज्ञान होते. अंतिम सत्याचे ज्ञान करून देणाऱ्या या विज्ञानालाच अतींद्रिय विज्ञान किंवा अध्यात्म विज्ञान म्हणतात. मात्र, अंतिम सत्याचे ज्ञान करून देणाऱ्या अध्यात्म विज्ञानाची व भौतिक सत्याचे ज्ञान करून देणाऱ्या भौतिक विज्ञानाची सत्य शोधण्याची वैज्ञानिक पद्धत (Scientific Method) एकच आहे, हे लक्षात ठेवावे. ही पद्धत म्हणजे प्रसिद्ध 'निरीक्षण व प्रयोग' होय. तथापि, या दोन विज्ञानात एक फरक आहे. तो म्हणजे भौतिक विज्ञानाचे निरीक्षण व प्रयोग ज्ञानेंद्रियामार्फत 'बाहेर' होतात, तर अतींद्रिय विज्ञानाचे निरीक्षण व प्रयोग अतींद्रियामार्फत 'आत' होतात. या आतील प्रयोगाचे वर्णन श्वेताश्वतर उपनिषदातील **'स्वदेहं अराणिं कृत्वा ... देवं पश्येत्'** या श्लोकात केले आहे. याचा अर्थ: 'स्वतःचा देह अग्नी निर्माण करणारे (अरणिरूपी) पात्र करून ओंकाराचे ध्यान

करून आत अग्निरूपी ईश्वर (सत्य) पाहावा.' (श्वे. उप. १.१४) आत केल्या जाणाऱ्या प्रयोगाला अध्यात्म विज्ञानात 'योग' म्हटले असून हा योग (किंवा प्रयोग) कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, ध्यानयोग इत्यादी नावांनी ओळखला जातो. भगवद्‌गीतेत कृष्णाने हे पुढीलप्रमाणे सांगितले आहे, **'ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना। अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे।।'** (**भ. गी.** १३.२४) म्हणजे ध्यानयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानयोग, कर्मयोग अशा विविध (प्र) योगांनी (योगी लोक) ईश्वररूपी सत्य पाहतात. योगसूत्रे लिहिणाऱ्या पतंजलींनी ध्यानयोगाला क्रियायोग व ईश्वरप्रणिधानही म्हटले आहे. 'ईश्वरप्रणिधान' हाच भक्तियोग होय. यालाच **भक्त्या मामभिजानन्ति** (भ. गी. १८.५५) 'भक्तियोगाने मला (ईश्वराला) जाणतात' असे गीतेत कृष्णाने म्हटले आहे. बाहेरील (भौतिक) प्रयोगाने भौतिक (आशाश्वत) सत्य कळते, तर आतील (अतींद्रिय) प्रयोगाने अतींद्रिय (शाश्वत) सत्य (ईश्वर) कळते. शाश्वत सत्य हे अशाश्वत सत्याचेही सत्य आहे असे उपनिषदकार म्हणतात. **'सत्यस्य सत्यम्'** (**बृ. उप.** २.१.२०) 'सत्याचे सत्य' हेच अंतिम सत्य असून त्याला उपनिषदात 'परम सत्य' म्हटले आहे. (**कठ उप.** २.३.१०) भौतिक विज्ञानाने भौतिक जगाच्या सत्याचे ज्ञान होत असले तरी भौतिक जग हे त्या परम सत्याचेच (परब्रह्माचेच) व्यक्त स्वरूप असल्यामुळे त्याच्या (भौतिक जगाच्या) अभ्यासाने जे (सैद्धांतिक) ज्ञान होते ते परम सत्याचेच; पण अप्रत्यक्ष ज्ञान असून ते बुद्धीला होते; पण म्हणून ते कमी महत्त्वाचे नाही. अतींद्रिय सत्य बुद्ध्यतीत असूनही भौतिक विज्ञानाने त्याचे ज्ञान बुद्धीला (तात्त्विक स्वरूपात व अप्रत्यक्ष रीतीने का होईना) होते, म्हणून भौतिक जगाचा वैज्ञानिक अभ्यास (भौतिक संशोधन) हा आध्यात्मिक सत्याच्या अनुभवासाठी आवश्यक आहे. 'वैज्ञानिक ज्ञानाचे प्रामाण्य' या लेखावरून वाचकांना याची कल्पना येईल.

अशा रीतीने भौतिक विज्ञानाप्रमाणेच अतींद्रिय वा अध्यात्म विज्ञान हेही प्रयोगनिष्ठ असले तरी काही भौतिकशास्त्रज्ञांना ते एक विज्ञान आहे हेच मान्य नाही. त्यांना अध्यात्म विज्ञान मान्य नसण्याचे कारण त्याचे प्रयोग दृश्य स्वरूपात बाहेर करता येत नाहीत हेच आहे. जे इंद्रियांना दृश्य नाही त्याचे अस्तित्व मान्य नसणाऱ्या शास्त्रज्ञांना भौतिकवादी (Materialist) शास्त्रज्ञ म्हणतात. हे भौतिकवादी शास्त्रज्ञ केवळ भौतिक वस्तूच्या संशोधनानेच विश्वाचे (ब्रह्मांडाचे) रहस्य कळेल असे समजतात. याचे एक उदाहरण म्हणून अलीकडे ज्या एका प्रयोगाचा वृत्तपत्रातून बराच गाजावाजा झाला आहे व होत आहे, त्या प्रयोगाचे देता येईल. जिनेव्हा शहराजवळील CERN (युरोपियन सेंटर फॉर न्यूक्लिअर रिसर्च) या भौतिक अणुगर्भ संशोधन केंद्रात 'लार्ज

हॅड्रॉन कोलायडर' नावाचे एक प्रचंड इलेक्ट्रॉन व्होल्ट (eV) शक्तीचे यंत्र निर्माण करून भौतिकशास्त्रज्ञ 'गॉड पार्टिकल' (ईश्वरी कण) नावाच्या एका कणाच्या शोधाचा प्रयोग करीत आहेत. या कणाचे मूळ नाव मात्र गॉड पार्टिकल नसून 'हिग्ज बोसोन' असे आहे. (पीटर हिग्ज व सत्येंद्रनाथ बोस या अनुक्रमे इंग्लिश व भारतीय शास्त्रज्ञांचे हे संयुक्तपणे दिलेले नाव आहे.) त्याला 'गॉड पार्टिकल' (ईश्वरी कण) हे नाव नोबेल पारितोषिक विजेत्या लिऑन लेडरमन या अमेरिकन भौतशास्त्रज्ञाने दिले आहे. (१९९३ साली **God Particle** नावाचे एक खास पुस्तक त्यासाठी त्याने लिहिले आहे. या पुस्तकाचा संदर्भ प्रस्तुत लेखकाने २००६ च्या **विज्ञान आणि चमत्कार** या पुस्तकात पृ.५२४ वर दिला आहे.) भौतिक पदार्थाला वस्तुमान (Mass) कशामुळे प्राप्त होते ही भौतविज्ञानातील एक मोठी समस्या असून ती सोडविण्यासाठी भौतशास्त्रज्ञांनी 'हिग्ज बोसोन' या कणाची कल्पना मांडली आहे. भौतिक पदार्थाला वस्तुमान देणाऱ्या या 'हिग्ज बोसोन' कणामुळेच विश्वात बहुविधता (Complexity) निर्माण झाली आहे असे मानण्यात येते. अशा रीतीने विश्वाला बहुरूपी बनवणारा (बहुरूपी विश्वाला जन्म देणारा) हा कण असल्यामुळे लेडरमनने त्याला 'गॉड पार्टिकल' (ईश्वरी कण) हे नाव दिले आहे. तात्पर्य, विश्वात वैविध्य निर्माण करणारा 'हिग्ज बोसोन' हा भौतिक कण म्हणजेच भौतिक शास्त्रज्ञांचा 'ईश्वर' (God) होय! त्याचा शोध लागला तर ईश्वराचा शोध लागल्याचा, विश्वाचे-ब्रह्मांडाचे-रहस्य उकलल्याचा, आनंद या भौतशास्त्रज्ञांना होणार आहे. त्याचसाठी तर अब्जावधी डॉलर्स खर्च करून प्रचंड शक्तीचे यंत्र त्यांनी निर्माण केले आहे. विश्व कसे निर्माण झाले हे मात्र या कणाच्या शोधामुळे कळणार नाही, हे लक्षात ठेवलं पाहिजे. कारण विश्वाच्या उत्पत्तीच्या सिद्धांताशी या कणाचा काही संबंध नाही. म्हणूनच या पुस्तकातील 'ज्ञानेश्वरीतील विश्वोत्पत्तिविज्ञान' या लेखात या कणाच्या प्रयोगाचा उल्लेख आलेला नाही. हा तथाकथित 'ईश्वरी कण' दृश्य विश्वाचाच भाग असल्यामुळे तो दृश्य विश्वाइतकाच सत्य आहे, हे नि:संशय खरे आहे; पण त्या 'सत्याचेही सत्य' वेगळेच आहे! ते 'अंतिम सत्य' असून त्या सत्याचा विश्वोत्पत्तीशी खरा (वास्तविक) संबंध आहे. त्याचे विज्ञान हे अध्यात्म विज्ञान असून ते भौतिक विज्ञानाचेही विज्ञान आहे- अंतिम सत्याचे विज्ञान आहे. त्या सत्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे; कारण विश्वाचे ते खरे रहस्य आहे.

**– प्राचार्य अद्वयानंद गळतगे**

✦✦✦